दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 2 ■ सोमवार, 23 मार्च 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

मोठ्या विजयासाठी मोठी जोखीम घ्यावी लागते.


SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615


## दैनिक आरंभ मराठीचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा थाटात, आरंभ मराठीवर शुभेच्छांचा वर्षाव



# समाजभान जपणारे आरंभ मराठी महाराष्ट्राच्या मनावर राज्य करेल

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे गौरवोद्‌गार

आरंभ मराठी । धाराशिव

**जिल्हा दैनिकापासून सुरू झालेला आरंभ मराठीचा अवघ्या दोन वर्षातला प्रवास अत्यंत प्रभावी ठरला असून, आगामी काळात आरंभ मराठी महाराष्ट्रात सर्वदूर पाहायला मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी व्यक्त केला. दैनिक आरंभ मराठीच्या द्वितीय वर्धापन दिनाच्या सोहळ्यात जिल्हाधिकारी बोलत होते.**

आरंभ मराठीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित स्नेह मेळाव्यात विविध मान्यवरांनी उपस्थिती लावत आरंभ मराठीवर शुभेच्छांचा वर्षाव केला. दरम्यान यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, धाराशिवच्या नगराध्यक्षा नेहाताई काकडे, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.संपादक चंद्रसेन देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह मान्यवरांच्या हस्ते आरंभ मराठीच्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी पुजार यांनी आरंभ मराठीच्या दोन वर्षातील दैदीप्यमान वाटचालीबद्दल कौतुक करत सकारात्मक आणि वस्तुनिष्ठ बातम्या देण्याचे काम माध्यमांनी केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. ते म्हणाले,देशभरात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे माध्यमांमुळे समोर आली असून,बातम्यांचा प्रभाव जनमानसावरच नाही तर प्रत्येक घटकावर पडतो. मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, नगराध्यक्षा नेहाताई काकडे, सुधीर पाटील यांनीही आरंभ मराठीला शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, कला,क्रीडा आदी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. आरंभ मराठीच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले. आभार कार्यकारी संपादक सज्जन यादव यांनी मानले.




## शेतातील झाडांना आग लावून अडीच लाखांचे नुकसान; २३० झाडे जळून खाक

आरंभ मराठी । मुरुम

उमरगा तालुक्यातील डिकसळ येथील गणेश नगर परिसरात शेतातील झाडांना आग लावून सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रताप संपणप्पा लामजने (वय 60, रा. येणेगूर ता. उमरगा) यांच्या शेत गट क्रमांक 125 मधील आंबा 125, फणस 2, चिक्कू 2, लिंबू 60, शेवगा 25, पपई 15 व मोसंबी 1 अशी एकूण 230 झाडे, तसेच मल्चिंग शीट, ठिबक सिंचन पाईप लाईन व सीसीटीव्ही फुटेज यांना आग लावून जाळण्यात आले. ही घटना दिनांक 21 मार्च 2026 रोजी पहाटे सुमारे 4.45 वाजता घडली. याप्रकरणी आरोपी म्हणून श्रद्धानंद गुणवंत लामजणे, पुतळाबाई गुणवंत लामजणे व गजानन गुणवंत लामजणे (सर्व रा. सुपतगाव ता. उमरगा जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून मुरुम पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 324(5), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पुतळा व जयंतीसाठी वर्गणीवरून वाद; कळंब तालुक्यात तरुणास मारहाण

आरंभ मराठी । कळंब

पुतळा व जयंतीसाठी वर्गणी न दिल्याच्या कारणावरून कळंब तालुक्यातील मोहा येथे एका तरुणास मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अमोल मुकुंद कसबे (वय ३९, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव) हे दिनांक २० मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजता मोहा येथील समाज मंदिरासमोर असताना आरोपींनी त्यांना अडवले. तू पुतळ्यासाठी व जयंतीसाठी पट्टी दिली नाहीस, तुला येथे येण्याचा काय संबंध असे म्हणत आरोपींनी शिवीगाळ केली. यानंतर गैरकायद्याची मंडळी जमवून लाथाबुक्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच परत आलास तर जिवे ठार मारू अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी आरोपी बाबासाहेब सोमनाथ कसबे, राहुल सोमनाथ कसबे, नाना सोमनाथ कसबे, प्रियांका बाबासाहेब कसबे व शितल राहुल कसबे (सर्व रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अखंड हिंदुस्थानचे क्रांतिपूत्र : भगतसिंग, सुखदेव, राजगुरू


विठ्ठल वळसे-पाटील
पुणे.- ८४८४०६६०४२






हा,भगतसिंग,हाय हा! जाशि आजि फाशी आम्हांस्तवची वीरा हाय, हा I स्वातंत्र्यवीर सावरकरांनी क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव, व राजगुरू यांचे देशाच्या स्वातंत्र्या साठी हौताम्य झाल्यावर काव्य लिहिले. यातून या क्रांतिकारकांच्या बलिदानाची महती लक्षात येथे. हसत हसत २३ मार्च १९३१ साली फासावर गेलेले या मातृभूमीचे क्रांतिवीर सदैव वंदनीय, प्रेरणादाई आहे. २३ मार्च हा दिवस शहीददिन त्यानिमित्त रणाविना स्वातंत्र्य कोणास मिळाले ! कवी गोविंद यांची हे काव्य, भारतभूमीच्या वीरांनी सार्थ केले. भारताला स्वातंत्र्य असे सहजा सहजी मिळाले नाही. त्यासाठी लाखों वीरांनी आपले शीर भरतभूमिचा चरणावर अर्पण केले. त्यातील भारतीय मनावर अधिराज्य करणारे क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव, व राजगुरू होय. यातील भगतसिंग जन्म १९०७ सालचा पंजाब प्रांतातील ल्यालपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला.ते उत्तम वक्ते, पत्रकार, व नाट्यकलाकार हि होते. १९२४-२५ च्या सुमारास बेळगाव येथील काँग्रेसच्या अधिवेशनात ते 'अकाली' या पत्राचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. उत्तम वाचक असल्याने त्यांनी लेनिन, मार्क्स, टॉलस्टॉय, गॉर्की, बकुनिन तसेच स्वा. सावरकरांचे हि साहित्य अभ्यासले होते.साम्यवादी समाजरचना व शोषणमुक्त सक्षम समाज घडविण्यासाठी त्यांनी क्रांतीचा मार्ग अवलंबला होता. तसेच सुखदेव थापर यांचा जन्म १९०७ साली लुधियाना मध्ये झाला. ते हिंदुस्थान सोशियालिस्ट रिपब्लिक असोसियेशन एक नेता होते. शिवाय संघटनेच्या चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग असे. लाहोर येथे नौजवान भारत सभेची स्थापनाही केली होती. त्यांच्यावरही साम्यवाद विचारांचा प्रभाव पडत होता.तसेच तिसरे क्रांतिकारक म्हणजे शिवराम हरी राजगुरू हे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यागावी १९०८ साली जन्म झाला. अचूक नेमबाजी, कुस्ती, व्यायाम, दांडगी स्मरणशक्ती होती. अनेक ग्रंथ हि तोंड पाठ होते. क्रांती कार्यात ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन आर्मीचे ते सदस्य होते.

या तिन्ही क्रांतिकारक ऐन तारुण्यात असताना अंगात स्वातंत्र्य विचार भरभरून वाहत होता. सप्टेंबर १९२५ साली भगतसिंग यांनी पुढाकार घेऊन उभारण्यात आलेल्या क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' ठेवले यातून समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे तर त्यातील 'आर्मी' गटात प्रत्यक्ष क्रांतिकार्यासाठी ठेवण्यात आले होते. यात चंद्रशेखर आझाद हे सेनेचे मुख्य सेनापती तर भगतसिंग यांच्यावर संघटनेचे समन्वयक या संघटनेचे स्वप्न व एकमेव ध्येय म्हणजे सशस्त्र क्रांतीद्वारे इंग्रज सरकार उलथून टाकून क्रांति मार्ग अवलंबला यात पुढे सुखदेव थापर शिवराम राजगुरू सहभागी झाले. ते या सन्घटनेचे सक्रिय कार्यकर्ते झाले. 'इन्किलाब झिंदाबाद' ही घोषणा सर्वत्र घुमू लागली

डिसेंबर १९२८ ला 'सायमन गो बॅक ' म्हणत पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या कमिशन मध्ये साम्राज्यावादी विचारांचे लोक असल्याने भारतीयांना सुधारणा मिळण्याची शक्यता नव्हती म्हणून तीव्र विरोध होता. यात लालाजी यांच्यावर बेछूट लाठी हल्ला केला यात त्यांना १७ दिवसांनी मृत्यू आला. यास पोलीस सुप्रिडेंट जेम्स स्कॉट व डेप्युटी पोलीस सुप्रिडेंट सॉंडर्स जबाबदार होते.चंद्रशेखर आझाद यांनी जेम्स स्कॉटच्या वधाचा कट रचला. १७ डिसेम्बर १९२८ हा दिवस निश्चित केला. या कटाची जबाबदारी भगतसिंग, आझाद, राजगुरू व जयगोपाल यांच्यावर होती. जयगोपालने माहिती पुरविन्याचे काम केले. लाल रंगाची मोटार सायकल बाहेर पडली त्यावर एक पोलीस अधिकारी होता. खुण केल्या प्रमाणे राजगुरुने गोळी झाडली. तो कोसळला. त्यावर भगतसिंगने गोळ्या झाडून ठार केले. परंतु यात स्कॉट ऐवजी सॉंडर्स मारला गेला. यावेळी शिपाई छगनसिंग व फर्न यांनी भगतसिंग व साथीदारांचा पाठलाग केला पण काही उपयोग झाला नाही. पुढे सारे फरार झाले व लालाजींच्या खुनाचा बदला घेतला . अशी लाहोर शहरात पत्रके झळकली. याचे जबाबदारी स्विकारल्याने नौजवान सभेच्या कार्यकर्त्यांना धरपकड केली पण हाती काही लागले नाही भगतसिंग, राजगुरू, व आझाद लाहोर सोडून बाहेर गेले. पुढे जतिनदास या कोलकत्यातील क्रांतिकारकांशी भेटून बॉम्ब बनविण्याचे शिक्षण घेतले बुटकेश्वर दत्त व भगतसिंग यांनी आग्रा येथे स्वतः एक बॉम्ब तयार केला. पुढे कामगार चळवळी विरुद्ध ट्रेड डिस्प्युट बिल मांडले जाणार होते. यास देशातील कामगार वर्गाच्या मोठा विरोध होता. ८ एप्रिल १९२९ ला असेम्ब्लीत बॉम्ब फेकला.' सभागृहात प्रचंड गोंधळ उडाला पुढे बुटकेश्वर दत्त व भगतसिंग दोघे स्वाधीन झाले. पोलिसांना काही माहिती मिळू शकली नाही. त्याच वेळी सुखदेव हे यांनी लाहोरला बॉम्ब बनविण्याचा कारखाना सुरु केला. तेथील एका लोहाराने बक्षिसाच्या हव्यासापोटी पोलिसात चहाडी केली. सुखदेव पकडले गेले पुढे किशोरलाल व जयगोपाल पोलिसांना सापडले.

१२ जून १९२९ भगतसिंग, बटुकेश्वर दत्त यांना जन्मठेप सुनावली. या शिक्षेला इन्किलाब झिंदाबाद व साम्राज्यशाहीचा विनाश घडो ! घोषणा दिल्या. चंद्रशेखर आझाद व यशपाल यांनी भगतसिंग व दत्त यांना सोडवण्यायी योजनाही असफल झाली. लाहोर कटातील एकूण १८ आरोपी होते. यात राजगुरू यांना पुण्यातून अटक केले. सुखदेव व राजगुरू यांना लाहोर येथे आणले. पुढे ७ आक्टोबर १९३० निकाल लागला. यात भगतसिंग , राजगुरू, सुखदेव यांना फाशीची शिक्षा झाली. सात जणास जन्मठेप व बाकी ये दिर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. यात हंसराज व जय गोपाल माफीचे साक्षिदार झाले. याचे दुःख आझाद यांना खुप झाले. २७ फेब्रुवारी १९३१ यांनाही फितुरीने घेरले यात आझाद शहीद झाले. तुरूंगात असताना भगत सिंग वर्तमान पत्रे, व्यवस्थित जेवण मिळावे म्हणून ६३ दिवसांचे उपोषण केले या त जतिन दास सारखा क्रांतिकारक मृत्यू पावला. घाबरून अखेर सरकारने मागण्या मान्य केल्या. अखेर २३ मार्च १९३१ सारा देश हळहळला. फासाकडे जाण्यास हे अखंड हिंदुस्थानच्या मातेचे वीर निघाले तेंव्हा 'मेरा रंग दे बसंती चोला I इसी रंग मे रंग सीवानो I मा का बंधन खोला, मेरा रंग दे बसंती चोला I हे गीत गात निर्भय व प्रसन्नपणे फासावर गेले. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू शहीद झाले. सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है, देखना है जोर कितना बाजूये कातिल में है। असे म्हणत पुन्हा या मातीत क्रांतिकारी जन्मले.

# शहिदांचे स्मरण आणि आजची जबाबदारी


रमेश कृष्णराव लांजेवार







आज शहीदांच्या पुण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने, प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन 'सायमन परत जा'च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला. ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सॅंडर्स यांना पचली नाही. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले. यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सॅंडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला. यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दुःख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सॅंडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलून सॅंडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सॅंडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सॅंडर्सला जागीच ठार केले व तेथून पलायन केले. यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले.शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली. भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोणीही कधीही विसरणार नाही. 'जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही'.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते. परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.

कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशाच्या विकासापेक्षा स्वतःच्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा, जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक, शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता—तो म्हणजे मातृभूमीची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा, भारत स्वतंत्र होऊन सुख-शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की 'लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण'. यामुळेच या कृषीप्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचाराच्या मार्गाने करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शून्य झालेला दिसतो. कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो, परंतु त्या काळात करोडपती बनतो—ही कसली देशसेवा, कसली देशभक्ती म्हणावी! भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य, शेतकरी गरीबीच्या खाईत जात आहे. या संपूर्ण बाबींची जाणीव राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे, तेव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही. फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी या पदाचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजेत. तेव्हाच शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.शहिद दिनाच्या निमित्ताने संपूर्ण देश शहिदांना आदरांजली अर्पण करीत आहे. परंतु त्यांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. १९ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हे दाखल आहेत, ही बाब अत्यंत धक्कादायक आहे. यावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज आहे.

शहिद दिनाचे औचित्य साधून बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला पाहिजे. जास्तीत जास्त वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धन करणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल. प्रत्येक झाडात, पानात, फुलात शहिदांचे स्मरण जिवंत राहील.हे भारतमातेच्या शहिद भूमिपुत्रांनो, माझा कोटी कोटी प्रणाम!

'जब तक सूरज चांद रहेगा, तब तक शहिदों का नाम रहेगा.'

# भोंदूबाबा खरात याचे सैतानी कारनामे..!


शिवाजी विठ्ठल चौगुले
मु.पो. मासा बेलेवाडी, कागल-कोल्हापूर





!! ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोनी म्हणती साधू !!
अंगी लावूनिया राख। डोळे झाकूनी करती पाप ।।
गाऊनी वैराग्याच्या कळा। भोगी विषयांचा सोहळा
।। तुका म्हणे सांगू किती। जाणोनिया त्यांची नीती ।।

भारताच्या शास्त्रज्ञांनी, तंत्रज्ञानांनी आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर चंद्राला गवसणी घातली. सर्व क्षेत्रात देशाची प्रगती झाली. सुशिक्षितांचे प्रमाण वाढले. सध्याच्या स्मार्ट फोन दूरसंचार क्षेत्रातल्या क्रांतीनंतरही भारतीय समाजाची अंधश्रध्दा, भोळेपणा, रूढीपरंपराच्या जोखडा तून मुक्तता मात्र झालेली नाही. परिणामी गेल्या काही वर्षात भारताच्या सर्वच भागात भोंदू, बुवा, साधू, तांत्रिक मांत्रिकांचे खूळ प्रचंड प्रमाणात वाढले आहे. समाजाच्या याच अंधश्रध्देची संधी साधत उपटसुंभ आणि मवाली वासनांध बुवांनी आपले स्तोम माजवले आणि त्यांच्या अंधश्रध्द भक्तांनी या असल्या मवाली भोंदूच्या पायावर लोळण घेत ही भोंदूगिरी अधिकच वाढवायचा करंटा उद्योग केला. आसाराम बापू, राम रहिम, रामपाल यासह अनेक ढोंगी बुवा महिलांवरचे अत्याचार, गुन्हेगारी, गुंडगिरी, खंडण्या अशा गुन्ह्यासाठी शिक्षा भोगल्या. भोळ्या भाबड्या भक्तांची संकटातून सुटका करण्याची ग्वाही देणारे हे भोंदू तुरुंगात खडी फोडायला गेले. भोंदू आणि ढोंगी बुवांचे बुरखे टराटर फाटले गेले. त्यांचे कटकारवाया, वासनाकांडे, चव्हाट्यावर आली. तरीही भारतीय समाजातला भोळसपणा मात्र संपलेला नाही, हे दुर्दैव होय आणि या असल्या भोंदू बुवाबाजीचे प्रस्थ अद्याप कायम असल्याने अलीकडेच वासनाकांडाने गाजायला लागल्याने तथाकथित तांत्रिक ज्योतिषी असल्याचा दावा करणाऱ्या भक्तांना लुटणाऱ्या महिलांची अब्रू घेणाऱ्या कॅप्टन अशोक खरातला पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतर त्याच्या बुवाबाजीचा जाहीर पंचनामा सुरू झाला आहे.

एक काळ व्यापारी जहाजावर कॅप्टन असलेला हा खरात निवृत्त झाल्यावर पाथर्डी पसिरात आला आणि त्याने आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार झाल्याचा दावा करत आपले स्तोम माजवले. सर्वसामान्य भोळीभाबडी माणसेही त्याच्या भूलथापांना बळी पडली. इतकेच काय पण शासनाचे वरिष्ठ अधिकारी, मंत्री, संत्री, आमदार, खासदार, प्रतिष्ठित महिला यासह व्यापक प्रमाणात त्याच्या भक्तगणांची संख्या वाढत गेली. तो अनेक चमत्कार घडवत असल्याचे संतती होत नाही त्यांना संतती होत असल्याचा बोभाटा त्याच्या भक्तांनी केला. परिणामी या भोंदू आणि मवाली खराताचे प्रस्थ आणि दबदबा प्रचंड वाढला. त्याच्या तथाकथित ईश्वरी अवताराच्या खोट्या कथा रंगायला लागल्या आणि नेमका याच संधीचा लाभ उठवत या नीच माणसाने अनेक महिलांवर अत्याचार केले. निर्लज्जपणाचा कळस गाठत विवाहित महिलांना धमक्या देऊन त्यांच्याकडून खंडण्या वसूल करीत त्यांच्यावर अत्याचार केले. त्यातील एका पीडित महिलेने धाडसाने पोलीस ठाण्यात त्याच्या विरुध्द फिर्याद दाखल केली आणि या खराताचा ढोंगाचा बुरखा फाडला. त्याची पापे उजेडात आली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात त्याच्या विकृत चाळ्याच्या ५८ ध्वनिचित्रफिती पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याच बुवाबाजीचा फायदा घेत या खराताने थोडी थोडकी नव्हे तर अवघ्या १० वर्षात तब्बल २०० कोटी रुपयांची मालमत्ता आणि संपत्ती जमवल्याचे निष्पन्न झाले आहे. मंत्री, आमदार, महिला आयोगाच्या अध्यक्षासह शेकडो महिलाही त्याच्या नादी लागल्या होत्या. शेकडो जणांचे जीवन उद्ध्वस्त करणारा हा चमत्कारी, वासनांध बाबा आता मात्र पोलिसांचा पाहुणचार घेतो आहे. हे सारे प्रकरणच संतापजनक आणि सुन्न करणारे आहे. आपला समाज या असल्या भोंदू बुवाबाजीच्या कराल विळख्यातून कधी मुक्त होणार...?

# ये जो पब्लिक है, ये सब जानती है!


किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

आज शाळेमध्ये मूल्यवर्धनाच्या तासाला 'स्वतःची वैशिष्ट्ये ओळखा' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधत होतो. एका मुलाला पुढे बोलावून इतर विद्यार्थ्यांना विचारलं, "सांगा, याच्यामध्ये कोणती वैशिष्ट्ये आहेत?"

मुले पटापट सांगू लागली—

"सर, तो/ती गोरा/गोरी आहे."

"काळा/काळी आहे."

"सर, त्याचे/तिचे केस काळेभोर आहेत."

"तो उंच आहे, ती बुटकी आहे..."

या बाह्य शारीरिक वैशिष्ट्यांनंतर मी पुढे विचारलं, "आणखी कोणती वैशिष्ट्ये आहेत?"

तेव्हा मुलं समोर उभ्या असलेल्या विद्यार्थ्याच्या स्वभाववैशिष्ट्यांबद्दल बोलू लागली—

"सर, तो खोड्या फार करतो."

"ती खोटं बोलते."

"तो अभ्यासात हुशार आहे, तर तो मठ्ठ आहे."

"ती इतरांना मदत करते."

"त्याला वर्गाबाहेर फिरायला आवडतं."

"तिला अभ्यासाचा खूप कंटाळा येतो..."

अशा प्रकारे मुलांनी एकमेकांची जणू संपूर्ण कुंडलीच वर्गासमोर मांडली!

शेवटी मी माझ्याबद्दल बोलायला सांगितलं. मुलं अजिबात न घाबरता सांगू लागली—

"सर, तुम्ही अभ्यास खूप घेतात."

"खेळ कमी घेता."

"आम्हाला खूप रागावता."

"पण कपडे छान घालता..."

माझ्या गुणांसोबत दोषही मुलांनी स्पष्टपणे मांडले. तेव्हा मनात एकच विचार आला—

"ये जो पब्लिक है, ये सब जानती है!"

समाजात अनेकजण स्वतःची प्रतिमा नीटनेटकी ठेवण्याचा प्रयत्न करतात. स्वतःला सुधारण्याचा आटोकाट प्रयत्नही करतात. "माणूस चुकीचा पुतळा आहे" ही म्हण जरी रूढ असली, तरी तिच्या आड लपून मनमानी चुका करणं योग्य नाही. आपण सतत स्वतःचं स्वयंमूल्यमापन केलं पाहिजे. इतरांकडून येणाऱ्या सकारात्मक टीकेनुसार बदल करण्याची तयारी ठेवली पाहिजे. मांजर माठात तोंड खुपसून दूध पिते आणि तिला वाटतं की कोणी पाहत नाही; पण वास्तव वेगळंच असतं. कारण— "ये जो पब्लिक है, ये सब जानती है!"

थोडक्यात, आपण स्वतःबद्दल तयार केलेली प्रतिमा नेहमीच खरी असेल असं नाही. आपण कितीही दिखावा केला, थोडाफार दानधर्म केला, सोशल मीडियावर स्वतःची स्तुती करणारी रील्स बनवल्या, तरी लोक आपल्या वागणुकीची खरी नोंद ठेवत असतात.

खोटी प्रतिमा निर्माण करण्याचा खटाटोप करून काहीच साध्य होत नाही. आपल्या आजूबाजूचे लोक आपल्या कृतींवरूनच आपल्याला ओळखतात. जर आपली प्रतिमा वाईट असेल, तर ती प्रामाणिक प्रयत्नांनी बदलता येते; पण स्वतःचं वागणंच योग्य आहे, असं समजून गेंड्याच्या कातडीसारखं कठोर होऊन बसलो, तर आपण कधीच लोकांच्या खऱ्या प्रेमाला पात्र ठरणार नाही.

म्हणूनच, स्वतःची वैशिष्ट्ये मोकळ्या मनाने जाणून घ्या. स्वतःतील दोष स्वीकारा आणि त्यांना दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा. यासाठी 'माझे सत्याचे प्रयोग' या महात्मा गांधीजींच्या पुस्तकांचे वाचन उपयुक्त ठरेल. शेवटी एवढंच—लोकांना फसवणं सोपं असतं, पण स्वतःपासून पळणं अशक्य असतं.खोटी प्रतिमा उभी करण्यापेक्षा सर्वांग सुंदर होण्याचा प्रयत्न करूया.

कारण, 'ये जो पब्लिक है... ये सब जानती है!

# आठ वर्षांच्या चिमुकल्यांचा पहिला रमजान रोजा पूर्ण



**आरंभ मराठी । उमरगा**

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून सर्वत्र भक्तीमय वातावरण आहे. या महिन्यात ३० दिवस निर्जळी रोजा ठेवून अल्लाहची इबादत केली जाते. वाढत्या उन्हाच्या तडाख्यातही उमरगा तालुक्यातील जकेकूर येथील अवघ्या आठ वर्षांची अनया नसरोद्दीन फकीर आणि नऊ वर्षांचा सरफराज रोफ फकीर यांनी आयुष्यातील पहिला रोजा दिवसभर निर्जळी राहून पूर्ण केला. त्यांच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत असून गावातील हबीब माहेताब फकीर, नसरोद्दीन हबीब फकीर, रोफ हबीब फकीर, राजअहेमद शेख, येजाज पठाण, बाबा जमादार, आमिर मुर्शद, फारूक मुर्शद आदींनी त्यांचे अभिनंदन केले.


हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv ( Maharashtra )._
विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्यूशन, ऑफिस नं[illegible] कोल्हापूर



# परंडा येथील भुईकोट किल्ल्याची दुरवस्था; ऐतिहासिक वारसा धोक्यात

## गटारीचे पाणी, दुर्लक्ष आणि निधीअभावी किल्ल्याचे अस्तित्व संकटात




अर्जुन गोडगे
परंडा

आरंभ मराठी विशेष


**राज्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग असलेला परंडा येथील भुईकोट किल्ला सध्या गंभीर दुरावस्थेला सामोरा जात आहे. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे किल्ल्याची भिंत, बुरुज आणि प्रवेशद्वार ढासळू लागले असून, या ऐतिहासिक वास्तूच्या जतनाबाबत प्रशासनाची उदासीनता पुन्हा एकदा समोर आली आहे. सुमारे १५व्या शतकात बांधण्यात आलेला हा भुईकोट किल्ला त्याच्या भक्कम बांधकामासाठी आणि लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या रचनेसाठी ओळखला जातो. किल्ल्याभोवती असलेली खोल खंदक व्यवस्था, मजबूत तटबंदी आणि प्राचीन तोफा ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. मात्र, सध्या या सर्व बाबींची झळाळी हरवत चालली आहे.**

अतिशय प्राचीन असा भुईकोट किल्ला त्याच किल्ल्याच्या खंदकामध्ये शहरातील गटारीचे पाणी जात असल्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना सुद्धा दुर्गंधीचा व घाणीचा सामना करावा लागत आहे. किल्ल्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गवत, झुडपे वाढली असून अनेक ठिकाणी तटबंदीला भेगा पडल्या आहेत. काही बुरुज कोसळण्याच्या स्थितीत असून पर्यटकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय किल्ल्याच्या परिसरात स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. प्लास्टिक कचरा आणि अतिक्रमण यामुळे ऐतिहासिक स्थळाचे सौंदर्यही बाधित होत आहे. स्थानिक नागरिक आणि इतिहासप्रेमी यांच्याकडून किल्ल्याच्या संवर्धनाची मागणी वारंवार केली जात आहे. परंडा किल्ला हा आपल्या अभिमानाचा विषय आहे. मात्र, शासनाकडून त्याच्या देखभालीकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. पुरातत्व विभागाकडून किल्ल्याच्या देखभालीसाठी काही उपाययोजना केल्या जात असल्या, तरी त्या अपुऱ्या ठरत असल्याचे चित्र आहे. किल्ल्याचे तातडीने संवर्धन, दुरुस्ती आणि पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याची गरज व्यक्त होत आहे. योग्य नियोजन आणि निधी उपलब्ध करून दिल्यास परंडा किल्ला हा एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकतो. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि ऐतिहासिक वारसाही जतन होईल. अन्यथा, भविष्यात हा ऐतिहासिक ठेवा कायमचा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



### किल्ल्याचे संवर्धन व विकास हा कळीचा मुद्दा

परंडा नगरपरिषद निवडणुकी वेळी माजी मंत्री डॉ तानाजीराव सावंत यांनी नगर परिषदेमध्ये सत्ता द्या किल्ल्याचे संवर्धन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले होते. शिवसेनेला सत्ता दिल्यास परांड्याच्या भुईकोट किल्लाला पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणू असं आश्वासनही माजी मंत्री तथा आमदार डॉ तानाजीराव सावंत यांनी दिले होते. जाकीरभाई सौदागर यांच्या रूपाने नगराध्यक्ष निवडून आले. परंतु, किल्ल्यासाठी मोठ्या प्रमाणात अद्यापही निधी उपलब्ध होऊ शकला नाही.



### आजी-माजी लोकप्रतिनिधीकडून अपेक्षा

माजी मंत्री तथा आमदार डॉ तानाजीराव सावंत हे भुईकोट किल्ला संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देतील अशी परंडातील जनतेला अपेक्षा आहे. त्याचबरोबर भाजपचे वरिष्ठ नेते तथा विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्याकडूनही किल्ला संवर्धनासाठी शासनाशी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून देतील, कारण सध्याला भाजपचे सरकार असल्यामुळे ते सहज शक्य आहे. परंतु किल्ल्याची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत असल्यामुळे ऐतिहासिक वारसा धोक्यात आला आहे. त्यामुळे आजी माजी लोकप्रतिनिधींकडून किल्ल्याचे संवर्धन होण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

# लाडकी बहीण" योजनेसाठी आधार संलग्नीकरण मोहीम तालुकास्तरावर समाधान कक्ष स्थापन

आरंभ मराठी । धाराशिव



राज्यातील महिलांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे तसेच श्रमबल पाहणीनुसार पुरुषांची टक्केवारी ५९.१० टक्के तर स्त्रियांची टक्केवारी २८.७० टक्के असल्याची बाब लक्षात घेता महिलांच्या आर्थिक व आरोग्य परिस्थितीत सुधारणा करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने दि.२८ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" ही योजना राज्यात सुरू केली आहे.या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व पात्र महिला लाभार्थ्यांनी अर्ज सादर केले असले तरी अनेक लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी संलग्न नसल्यामुळे त्यांना अद्याप योजनेचा लाभ त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही.ही अडचण दूर करण्यासाठी तालुकास्तरावर एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात "समाधान कक्ष" स्थापन करण्यात आले आहेत.सर्व महिला लाभार्थ्यांनी संबंधित तालुक्यातील प्रकल्प कार्यालयात जाऊन समाधान कक्षातील कर्मचाऱ्यांकडून आपली समस्या दूर करून घ्यावी, तसेच ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेत मोबाईल व मूळ आधार कार्डची छायांकित प्रत घेऊन स्वतः उपस्थित राहून आधार संलग्नीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी,असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांनीही ही प्रक्रिया मोहिम स्वरूपात राबवून आधार संलग्नीकरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या कार्यात अंगणवाडी पर्यवेक्षिका व सेविकांनी संबंधित महिला लाभार्थ्यांना बँकेत जाणे व आधार संलग्नीकरण करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे,असेही सांगण्यात आले आहे. तसेच, काही कारणास्तव ई-केवायसी (e-KYC) प्रलंबित असल्यास किंवा चुकीची झाल्यास संबंधितांनी तालुक्याच्या प्रकल्प कार्यालयात जाऊन मार्गदर्शन घेऊन दि.३१ मार्च २०२६ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यावर योजनेचा लाभ विनाविलंब जमा होईल,असे आवाहन अध्यक्ष,जिल्हा परिषद व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद धाराशिव यांनी केले आहे.

# शिराढोणमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; नवोदय व संगीत परीक्षेत यशस्वींचा गौरव

आरंभ मराठी । शिराढोण



राणाजगजितसिंह पाटील युवा प्रतिष्ठान व ग्रामपंचायत कार्यालय शिराढोण यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 20 मार्च रोजी नवोदय प्रवेश पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानचे तालुका सचिव किरण पाटील यांनी केले. यावेळी पीएमश्री आदर्श जि.प. प्रशाला, शिराढोण येथील मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, तुळजापूर येथे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरलेले कार्तिक बाळासाहेब जाधवर, शिवप्रताप सचिन कवडे, श्रावणी चंद्रकांत सूर्यवंशी व वैष्णवी बापू सहाणे यांचा सत्कार करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून मुख्याध्यापक सुनील अहिरे यांच्यासह मंजुषा बामणे, भाऊसाहेब जाधव, सचिन शिंदे, शितल जाधव, रमेश व्होके व रमेशकुमार काकडे यांचा गौरव करण्यात आला. तसेच अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या शास्त्रीय संगीत गायन व वादन परीक्षेत यश संपादन केलेल्या विराट संघशील रोडे, पलक वैभव कोंडेकर, राधेय अमोल परदेशी व गौरी दिनेश कावळे या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव किरण पाटील यांनी शाळेत रिक्त असलेली शिक्षक व परिचर पदे जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या माध्यमातून तात्काळ भरण्यात येतील, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमास पंचायत समिती उपसभापती प्रणिता चव्हाण, शहाजीदादा पाटील, प्रणव चव्हाण, सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे, उपसरपंच अमोल माकोडे, पंचायत समिती सदस्य गजानन माकोडे, नामदेव माकोडे, रणजीत गवळी, झेलम शिंपले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष मालती सहाणे, निलेश नाईकवाडे, अनुपकुमार परदेशी, राहुल माने, अशोक महाजन, गणेश म्हेत्रे, तंटामुक्ती अध्यक्ष अमोल नाईकवाडे, आबा सहाणे, दत्ता म्हेत्रे, बेबीनंदा गोरे, अनिल गायसमुद्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक दत्तात्रय राठोड यांनी केले.

आरंभ मराठी

## हजारोंनी इदगाह मैदानावर नमाज पठण करत दिला एकात्मतेचा संदेश


# नळदुर्गात ईद-उल-फित्र उत्साहात

आरंभ मराठी । नळदुर्ग



नळदुर्ग व परिसरात २१ मार्च रोजी ईद-उल-फित्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नळदुर्ग शहरातील इदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्रित येऊन नमाज अदा केली. यावेळी सर्वप्रथम जामे निजामियाचे शेखूल हदीस अल्लामा मौलाना हाफेज व खारी सय्यद सगीर अहमद जागीरदार यांनी रमजानच्या महत्त्वावर धार्मिक प्रवचन केले. त्यानंतर शहर काझी हाफेज मोहम्मद अली मैनोदीन काजी यांनी खुदबा पठण केले. पुढे धर्मगुरू हाफेज जागीरदार यांनी सुख, शांती, समृद्धी, बंधुभाव व एकात्मतेसाठी प्रार्थना केली. नळदुर्ग नगरपालिकेचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या वतीने मुस्लिम बांधवांचे पुष्प व पाण्याच्या बाटल्या देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस अधीक्षक मेघना आय.एन., उपनगराध्यक्ष नय्यर पाशा जागीरदार, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय दासकर, नगरसेवक शशिकांत पुदाले, प्रवीण गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक संतोष गीते, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, किशोर बनसोडे, बलदेव ठाकूर, धिमाजी घुगे, सूर्यकांत फुलसुंदर, अमर जाधव, बालाजी शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सहाय्यक पोलीस अधीक्षक मेघना आय.एन. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान, नळदुर्ग शहरातील जामा मस्जिद, ऐतिहासिक किल्ल्यातील शाही जामा मस्जिद, हमीद खाँ मस्जिद, मरकज मस्जिद तसेच अणदूर, जळकोट, हंगरगा, इटकळ, निलेगाव, काटगाव, केशेगाव, चिवरी (उमरगा), वागदरी, शाहपूर, सलगरा दिवटी, लोहगाव, बोरगाव, सिंदगाव, नंदगाव आदी गावांमध्येही ईद-उल-फितरची नमाज अदा करण्यात आली. यावेळी हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा देत सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला.

# पवन मिसाळ यांची लँड सर्व्हेअरपदी निवड



आरंभ मराठी । परंडा

शिरसाव गावचे सुपुत्र पवन मिसाळ यांची महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख विभाग, नाशिक येथे लँड सर्व्हेअर (भूकरमापक) पदावर निवड झाली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर हे यश संपादन केले. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना सातत्य ठेवत त्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित केले आणि अखेर सरकारी सेवेत स्थान मिळवले. पवन मिसाळ यांच्या या यशाबद्दल शिरसाव येथील मित्रपरिवाराच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) नेते श्रीगणेश चोबे, गजानन पाटील, किरण वायकुळे, रणजीत देवराम, गजानन मुके आदी उपस्थित होते. त्यांच्या निवडीबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ‘महालक्ष्मी सरस’ ठरतेय महिलांची आर्थिक ताकद

## 10 कोटींची विक्री, राज्यभर ‘उमेद मॉल’ची घोषणा

**आरंभ मराठी । नागपूर**

महिलांच्या बचत गटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणारे ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शन आता राज्यातील एक प्रभावी ब्रँड म्हणून पुढे येत असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. हे प्रदर्शन केवळ विक्रीपुरते मर्यादित न राहता महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे सक्षम व्यासपीठ बनत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यंदाच्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुमारे ४०४ स्टॉल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत तब्बल १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता ही विक्री आणखी वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राज्यभरात बचत गटांच्या माध्यमातून जवळपास १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असून,



महिलांच्या उद्योगांना यामुळे मोठी चालना मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. महिलांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ‘उमेद मॉल’ उभारण्याचा सरकारचा मानस असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनीही या योजनेची माहिती देताना पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल सुरू करण्याचे नियोजन असल्याचे स्पष्ट केले. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात हे जाळे उभे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. ‘लखपती दीदी’ अभियानाच्या माध्यमातून १ कोटी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले असून, महिलांना उद्योग, मार्केटिंग आणि ब्रँडिंगच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यांच्या उत्पादनांना देश-विदेशात बाजारपेठ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते. महालक्ष्मी सरसच्या माध्यमातून महिलांना दरवर्षी नागपुरात हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. एकीकडे महिलांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळत असताना, दुसरीकडे शासनाच्या या उपक्रमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचा प्रयत्न अधिक गती घेत असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे.

## राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाला गती द्या; ९ वर्षांनंतरही मागणी कायम

**आरंभ मराठी । धाराशिव**

देशातील महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प लवकर पूर्ण करून दुष्काळावर मात करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांनी २१ मार्च २०१७ रोजी दिल्ली येथील जंतर-मंतरवर उपोषण केले होते. या उपोषणास आता नऊ वर्षे पूर्ण झाली असून त्यांनी आजपर्यंत राज्य व केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. प्रकल्पाची व्याप्ती मोठी असली तरी आवश्यक निधी उपलब्ध करून अडचणी दूर केल्यास तो लवकर पूर्ण होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले आहे. यासाठी वाघमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्फत लेखी निवेदन व ई-मेलद्वारे मागणी केली असून, संबंधित विभागालाही याची माहिती दिली आहे.

## महाराष्ट्र कुमार खो-खो संघाच्या प्रशिक्षकपदी बिभिषण पाटील यांची निवड

**आरंभ मराठी । धाराशिव**



धाराशिव जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील सक्रिय व्यक्तिमत्व बिभिषण पाटील यांची महाराष्ट्र कुमार (ज्युनियर) खो-खो संघाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड महाराष्ट्र समन्वयक सुरेश गांधी यांनी जाहीर केली. खो-खो इंडिया आयोजित ओडिशा राज्यातील अथागड येथे दिनांक ३० मार्च ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत राष्ट्रीय ज्युनियर कुमार व मुलींची खो-खो स्पर्धा पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या १८ वर्षाखालील कुमार व मुली अशा दोन्ही संघांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, मुलांच्या संघाच्या प्रशिक्षकपदी बिभिषण पाटील यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बिभिषण पाटील हे गेल्या अनेक वर्षांपासून खो-खो क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके पटकावली आहेत. पंच, राज्य प्रशिक्षक तसेच संघटनात्मक स्तरावरही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून खेळाडू घडविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या या निवडीमुळे धाराशिव जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या लौकिकात भर पडली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विक्रम भैय्या पाटील, दिलीप चव्हाण, पवन वाठवडे, रामकृष्ण खडके, विकास चव्हाण, प्रमोद शिंदे, नेताजी ढवण, बालाजी भोसले, गणेश कदम, दिगंबर कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

## भाविकांच्या कारला आग, जीवित हानी टळली

**नळदुर्ग :–** उमरग्याहुन तुळजापुर येथे आई तुळजा भवानीच्या दर्शनासाठी निघालेल्या उमरगा येथील भाविकांच्या इर्टीगा कारला सोलापुर - हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर 22 मार्च रोजी दुपारी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास नळदुर्ग जवळ मुर्टा पाटीच्या पुढे अचानक आग लागली. या आगीमध्ये इर्टीगा कार पुर्णपणे जळुन खाक झाली आहे. दैव बलवत्तर म्हणुन गाडीतील सर्व सातच्या सात भाविक सुखरूप बचावले आहेत.

22 मार्च रोजी उमरगा येथील आकाश दिनकर अंधारे हे इर्टीगा कार (क्र. एम. एच. 25 बीएफ 1604) या वाहनाने दुपारी उमरग्याहुन आपल्या कुटुंबासह आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापुरला चालले होते. त्यांची इर्टीगा कारला दुपारी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रोडवरील मुर्टा पाटीच्या पुढे आल्यानंतर अचानक आग लागली. यावेळी गाडीतुन धुर येत असल्याचे वेळीच वाहन चालक पुरुषोत्तम रघुनाथ सुर्यवंशी यांच्या लक्षात आल्याने त्यांनी तात्काळ गाडी रस्त्याच्या बाजुला उभी करून गाडीतील सर्वांना खाली उतरविले. भाविक गाडीच्या खाली उतरल्यानंतर गाडीला मोठी आग लागली यामध्ये इर्टीका कार पुर्णपणे जळुन खाक झाली आहे. चालकाने दाखविलेले प्रसंगावधान आणि दैव बलवत्तर म्हणुन गाडीतील सर्वच्या सर्व सात भाविक सुखरूप बचावले आहेत. या इर्टीगा कारमध्ये 3 महिला, 2 पुरुष व दोन लहान मुले असे एकुण 7 जन होते. राष्ट्रीय महामार्गावर वाहनाला आग लागल्याचे समजताच नळदुर्ग नगरपालिकेचे अग्निशमन वाहनासह महामार्ग पोलिस व नळदुर्ग पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी जाऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत इर्टीगा कार जळुन खाक झाली होती.

## रामनवमीला भाजपची भव्य शोभायात्रा

**आरंभ मराठी । धाराशिव**

प्रभू श्रीरामांच्या जयंतीनिमित्त २६ मार्च रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात भव्य शोभायात्रा काढण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आमदार राणाजगजीतसिंह पाटील आणि माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली. जिल्हाभरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रामनवमीच्या



निमित्ताने धाराशिव शहरासह ग्रामीण भागातही धार्मिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.या शोभायात्रेत सामाजिक व धार्मिक संस्था, भजनी मंडळे, वारकरी संप्रदाय, तसेच विविध क्षेत्रातील नागरिक, डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी, उद्योजक, युवक व महिला मंडळे यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सेवाभावी व स्वयंसेवी संस्थांनाही या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सदर शोभायात्रा सकाळी १० वाजता प्रत्येक शहरातील प्रमुख चौकातून प्रारंभ होऊन त्या भागातील प्रभू श्रीराम मंदिर किंवा प्रमुख मंदिरात विसर्जित होणार आहे. जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी केले आहे.

## तेर येथील श्रीराम मंदिरात रामजन्मोत्सवाला उत्साहात प्रारंभ

**तेर** :–तेर येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यास उत्साहात प्रारंभ झाला असून चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मठाधिपती अमोल महाराज रामदासी यांनी केले आहे. गुढीपाडव्यापासून रामनवमीपर्यंत दररोज पहाटे पावमान अभिषेक, नित्यपूजा, अध्यात्म रामायण संहिता पारायण, नैवेद्य व आरती यांचे आयोजन केले आहे. तसेच दुपारी भागवताचार्य बाळासाहेब रामदासी यांचे अध्यात्म रामायणावर निरूपण होणार असून रामदासी नित्य उपासना, दासबोध वाचन आदी कार्यक्रमही पार पडणार आहेत. संध्याकाळी रामदासी कीर्तन सेवेने परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघत आहे. नवरात्रोत्सव काळात माधव महाराज रामदासी, भारत महाराज साकतकर (वैराग), आरोही अमोल रामदासी, श्रीनिवास महाराज खर्डेकर (परंडा), अतुल महाराज शास्त्री (तडवळा), प्रज्ञा प्रशांत महाजन (धाराशिव), श्रीराम महाराज रामदासी तसेच अमोल महाराज रामदासी यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे तेर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नळदुर्ग येथे 10 कोटींचे हशीश ऑइल जप्त

नळदुर्ग :- नळदुर्ग येथे गुरुवारी (दि.१९) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास नळदुर्ग ते तुळजापूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर पोलिसांकडून कॉम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी सुरू असताना एक संशयित कार (MH-12 GV-1517) वेगाने पळून जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे आढळले. पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला असता, कारमधील व्यक्तींनी सुमारे १० कोटी रुपयांचे हशीश ऑइल सदृश्य अमली पदार्थ असलेली बॅग रस्त्याच्या कडेला फेकून दिली आणि अंधाराचा फायदा घेत फरार झाले. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगूने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके करीत आहेत.

## धाराशिवमध्ये गूढ स्फोटासारखा आवाज; भूकंपाची नोंद नाही

**धाराशिव** :- धाराशिव शहरासह जिल्ह्यात अचानक प्रचंड मोठा गूढ आवाज ऐकू आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी हा आवाज स्फोटासारखा किंवा आकाशात काहीतरी घडल्यासारखा जाणवला असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली होती. या वेळी काही वेळ जमीनही हादरली. या घटनेनंतर काही काळ नागरिकांमध्ये संभ्रम आणि घबराट पसरली. अनेकांनी घराबाहेर येत परिसरात काय घडले याची चौकशी केली. काही भागांमध्ये घरांच्या काचा थरथरल्याचेही नागरिकांनी सांगितले. दरम्यान, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने या घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ माहिती घेऊन भूकंप झाला का याची पडताळणी संबंधित यंत्रणांकडून केली. मात्र, भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झाली नसल्याची माहिती मिळाली. अशा प्रकारचे आवाज कधी कधी आकाशातील ध्वनीलहरी, सुपरसॉनिक विमानांची हालचाल किंवा वातावरणातील अचानक दाब बदलामुळेही निर्माण होऊ होतात.

## २५ वर्षांपासून आरळी खुर्द–काळेगाव रस्ता खड्डेमय, तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील आरळी (खुर्द) – आरळी (बु.) – काळेगाव हा महत्त्वाचा जिल्हा मार्ग गेल्या तब्बल २५ वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून नागरिकांचे हाल वाढले आहेत. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वारंवार अपघात होत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी यापूर्वी वर्गणी गोळा करून रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली होती, मात्र काही काळातच परिस्थिती पूर्ववत झाली. निवडणुकांदरम्यान वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एसटी



बस सेवा खंडित झाली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच रुग्णांना वेळेत उपचारासाठी पोहोचवणे कठीण झाले आहे. बाजारपेठेवरही परिणाम होऊन स्थानिक अर्थचक्र मंदावले आहे. दरम्यान, नागरिकांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## अणदूरमध्ये मोफत नेत्रशिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; शेकडो रुग्णांची तपासणी

### ४० जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया



**अणदूर** :–तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे अश्वमेघ मित्र मंडळाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. पुणे अंधजन मंडळ संचलित शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर तसेच दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने धनराज मुळे कॉम्प्लेक्स, अणदूर येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन श्रीमती नवलबाई गोवे (सेवानिवृत्त मुख्याध्यापक) व धाराशिव जिल्हा एस.टी. बसचे माजी डीसीएम प्रदीप खोबरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिबिरात शेकडो रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली असून, ४० रुग्णांवर मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर व योग्य उपचार मिळावेत, यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला.या उपक्रमामुळे अणदूर परिसरातील अनेक रुग्णांना दिलासा मिळाला असून, भविष्यात गोरगरीब जनतेच्या आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी अशी शिबिरे सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अश्वमेघ मित्र मंडळाचे सदस्य दत्ता आलुरे यांनी दिली. नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करून अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## खेडच्या स्मिता शिंदेचे एमपीएससीत परीक्षेत यश

### मंडल कृषी अधिकारी पदाला गवसणी

**आरंभ मराठी । धाराशिव**



महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत धाराशिव तालुक्यातील खेड येथील स्मिता जयंत शिंदे हिने उल्लेखनीय यश संपादन करत मंडल कृषी अधिकारी (वर्ग-२) पदाला गवसणी घातली आहे. तिने ४५० पैकी २९३ गुण मिळवत ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात १७ वा क्रमांक पटकावला आहे.स्मिता शिंदे हिने यापूर्वीही एमपीएससी परीक्षेत मुलाखतीपर्यंत मजल मारली होती. सातत्यपूर्ण प्रयत्न, अभ्यासाची सवय आणि जिद्दीच्या जोरावर अखेर तिने यशाला गवसणी घालत आपल्या कुटुंबाचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. स्मिता हिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धाराशिव शहरात झाले. पुढे तिने बीएससी (ॲग्री) चे शिक्षण कोल्हापूर येथून पूर्ण केले, तर एमएस्सी (ॲग्री) पदवी पुणे येथून संपादन केली. सध्या ती राहुरी येथील कृषी विद्यापीठात पीएचडीसाठी संशोधन करत आहे.आपल्या यशाबद्दल बोलताना स्मिता शिंदे म्हणाली की, प्रामाणिक मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर हे यश मिळवता आले. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याचा मला अत्यंत आनंद आहे. पुढे ती म्हणाली की, ग्रामीण भागातील होतकरू मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये करिअर घडवावे. त्यासाठी पालकांनी मुलींना प्रोत्साहन व संधी द्यावी, अशी अपेक्षाही तिने व्यक्त केली.मिता हिचे वडील जयंत शिंदे हे प्रगतिशील शेतकरी असून आई गृहिणी आहे. तिच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आरंभ मराठी

## ‘आपल घर’ येथील मुलांना साखरेचे हार वाटप

## गुढीपाडव्याच्या निमित्ताने राजेंद्र महाबोले यांचा स्तुत्य उपक्रम

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नळदुर्ग येथील नाभिक समाजाचे नेते व व्यापारी राजेंद्र महाबोले यांनी सामाजिक बांधिलकी जपत ‘आपल घर’ या निवासी शाळेतील मुलांना साखरेचे हार वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम यंदाही उत्साहात पार पाडला. गेल्या अनेक वर्षांपासून ते सातत्याने हा उपक्रम राबवत असून समाजात एक आदर्श निर्माण केला आहे. यावर्षीचा कार्यक्रम अत्यंत सुंदर व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



राजेंद्र महाबोले यांच्या मातोश्री श्रीमती सरुबाई महाबोले, नळदुर्ग नगरीचे पाणी पुरवठा सभापती तानाजी जाधव तसेच नगरसेविका राणीताई शिवाजी सुरवसे यांच्या हस्ते साखरेचे हार वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ‘आपल घर’ येथील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी नगरसेवक तानाजी जाधव व माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे कौतुक करत राजेंद्र महाबोले यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. कार्यक्रमास विकास सोसायटीचे सदस्य रघुनाथ नागणे, सेवानिवृत्त शिक्षक सुभाष महाबोले, संजय जाधव, दिशा नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक उमेश जाधव, ओंकार महाबोले, आकाश सुरवसे, लखन महाबोले, विशाल सुरवसे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## नळदुर्गमध्ये स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात; बोरी नदीकाठी भव्य ध्यान मंदिर उभारण्याची घोषणा

**आरंभ मराठी । अणदूर**

समर्थ नगरी प्रतिष्ठान अक्कलकोट तसेच नळदुर्ग-अणदूर परिवाराच्या वतीने नळदुर्ग येथे अक्कलकोट स्वामी समर्थ प्रकट दिन मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी नामस्मरण व ध्यानसाधनेच्या माध्यमातून भक्तांनी स्वामींच्या चरणी श्रद्धा अर्पण केली. या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांनी बोरी नदीच्या तीरावर भव्य ध्यान मंदिर उभारण्याची घोषणा केली. नळदुर्ग येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी ही माहिती देताना, ध्यान मंदिरासाठी आवश्यक जागा उपलब्ध झाल्याचे सांगितले.नदीकाठावरील जागा सीमा जोशी, गायत्री कुलकर्णी आणि मंजुषा जेवरीकर यांनी दिली असून, त्याच्या शेजारी समर्थ नगरी प्रतिष्ठाननेही जागा घेतली आहे. याच ठिकाणी भविष्यात ध्यान मंदिर उभारण्यात येणार आहे. कार्यक्रमाला नळदुर्ग व अणदूर परिसरातील अनेक स्वामी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. विशेषतः महिलांची



उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमस्थळी स्वामी समर्थांचे वस्त्र व प्रतिमा ठेवण्यात आल्या होत्या. महिलांनी भजन, तारकमंत्र, ध्यान व नामजप करत प्रकट दिन साजरा केला. राज्यभरात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे तसेच स्वामीभक्त चोळप्पा महाराज यांचे वंशज वे.शा.सं. अण्णू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी नामप्रसाराचे कार्य सुरू आहे.या कार्यक्रमाला सैदप्पा इंगळे यांच्यासह अक्कलकोट येथून गणेश पाठक, सौ. सुखदा ग्रामोपाध्ये, राहुल वटकर, कावेरी धरणे, पत्रकार संजय जेवरीकर, कल्याण कुलकर्णी, राहुल कुलकर्णी तसेच जागा मालक शरद देशमुख आदी उपस्थित होते.

आरंभ मराठी